म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २२४०

ी कहान

# ंजर

REFBK-0022262
REFBK-0022262

आद्य संदर्भ
२२२६२
२०/७/५८

# सांजर

सुरेश कदम

REFBK-0022262
REFBK-0022262

जोती फुले
प्रकाशन
मुंबओी

प्रकाशक :

**बाबुराव बागूल**
**जोती फुले प्रकाशन**
१/८ माटुंगा लेबर कॅम्प
माटुंगा, मुंबई–१९.

© **सौ. शिल्पा कदम**
**सुरेश कदम**
सट्रल गव्हर्नमेंट स्टाफ क्वॉर्टर्स
टाईप ३, ब्लॉक १०७, वडाळा, मुंबई नं. ३१.

मुखपृष्ठ : **बाळ ठाकूर**

मुद्रक :

**सौ. व. द. पोतनीस**
यशवन्त प्रिंटिंग प्रेस, नासिक.

प्रथमावृत्ती : १४ जानेवारी १९७८

**मूल्य सहा रुपये**

## सुरेश कदम

'सांजर' माझा पहिलाच कवितासंग्रह. बाबुराव बागूल यांनी तो प्रकाशित करायचं धाडसच केलंय.

'सांजर' विषयी मी तसं काहीच बोलणार नाही. माझा माणसावर विश्वास आहे. त्याचा राग, लोभ, काम, क्रोध, करुणा, प्रीती यांवर. माणूस या सगळ्यातून व्यक्त होतो. म्हणून तो मला माझा वाटतो. त्याच्यावर मी प्रेम करतो. हा माणूस सतत माझ्या सभोवार वावरत असतो किंवा मी माणसांच्यामध्ये.

हा माणूस या जगाचा नियंता आहे असं मी समजतो. त्यानेच हे जग निर्माण केलं. घडवलं. त्याचा कर्ता करविता तोच. तोच त्याला हवं तसं नवीन जग निर्माण करणार आहे. जगाला नित्य नवीन नवं रूप देणार आहे. या माणसाने मला विश्वास दिला. त्याच्याविषयी आणि माझ्याविषयी.

'सांजर' साठी बाळ ठाकूर यांचं चित्र मिळालं ते त्यांच्याविषयीच्या प्रेमापोटीच. मनोहर शहाणे या अेका दोस्ताचा परिचय झाला, त्यांचं मोलाचं साहाय्य मिळालं, त्याचप्रमाणे नेवासकर व यशवंत प्रिंटिंग प्रेसच्या मालक सौ व. द. पोतनीस व प्रेसचे कामगार यांचाही मला निर्देश करायला हवाच.

प्रभाकर श्रीधर नेरूरकर हे अेक नाव असे की, त्यांचे आभार मानणे औपचारिकपणाचंच ठरेल. आणि माझ्यावर प्रेम करणारे माझे दुर्मिळ दोस्त.

बाबुराव बागूल : अथांग करुणेप्रमाणे
पाठराखण केली.
त्यांचे आभार कसे मानायचे !

# सांजर

अस्वस्थ करणाऱ्या
कवितेसाठी : तिच्यासाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२६२
ग्रं. क्र. ९११०२५
२३७०
शाखा (स्थळ प्रत)

सवय झालीय
तिच्या घराकडे पावलं आपोआप वळतात
गोड हसते ती
मुळीच लाजत नाही
खरं तर तिच्या हसण्याचा अर्थही कळत नाही
तिचं हसरं अस्तित्वच हवंसं वाटतं
टेबलापाशी काहीसं वाचत बसलेली ती
हिरव्या गर्द रंगाच्या खोलीत
तिचा हिरव्याच रंगाचा फ्रॉक खोलीला मॅच होणारा
टेबलावर फुटाच्या अंतरावर फुलदाणीत
स्वच्छ मोकळी फुलं तिच्या चेहऱ्यासारखीच
हवंहवंस वाटणारं तिचं अस्तित्व
कल्पनाच करवत नाहीय
पारिजाताखाली फुलं वेचताना ती कशी दिसेल
गंभीर की अल्लड
गुलमोहराच्या झाडाखालून वळताना
तिच्या चेहऱ्यावर अुमटेल का लाली
तिला हवासा वाटेल का आकाशाचा निळा अेकांत
आभाळासंबंधी कुणाला काय कळतंय
सवय झालीय तिला शोधत फिरायची

अन्हातान्हात
वाऱ्यापावसात
थंडीगारव्यात
तिचं होत असेल का फुलपाखरू
फुलांवर बागडणारं
नार्सिससचं कोवळं फूल
ती न्याहाळत असेल का आपलं प्रतिबिंब
आरशात निष्काळजीपणे
माझ्या व्हाईटवॉश केलेल्या भिंतीवर मी
तिचं एक चित्रं रेखाटणार आहे
रंगांच्या धारांनी ओसंडणारं अविरत पावसाचं चित्र
मग घराच्या भिंतीवर बसतील फुलपाखरं
त्यांचं होईल एक सुंदर मधुबन
नकोच तसं
फुलपाखरं काळीसुद्धा असतात
अन् काळी फुलपाखरं
तिच्याही चेहऱ्यावर ती शोभून दिसणार नाहीत
तर नकोच हे सगळं

क्षितिजावर संपणारी अंध अनाकलनीय संध्याकाळ
अेवढं पुरेसं होअील तिचं नाव
सवय झालीय तिला शोधत फिरायची
अन् अचानक असं काय होतंय
दुरून एक पक्षी काळाकुट्ट
घिरट्या घालीत फिरतोय
संध्याकाळ सरत येतेय
तो त्या मुलीचं हसू गिळणार तर नाही
मग खोलीचा रंग जाअील अुडून
फुलदाणीतली फुलं
कोमेजतील
दिवसांमागून दिवस जातील
खोलीच्या भिंती पडतील
दिलासा देणारं ते हसू
विरत जाअील हृदयाच्या
आरपार
अेक निनावी कथा
अेका दुखऱ्या अस्तित्वाची

⁂

तो कितीक वेळ वाट पहात होता
शेवटी ती आलीच
'आज आकाश ढगाळ दिसतं ना'
ती म्हणाली:
'हो, थोडंसं तसंच'
अन् तिला जाणवलं
ढग जमू लागलेत
त्याला सावरायलाच हवं

*

आत्म्याला कैद
अंतर्बाह्य येरझारा
अेक अेक मिनिट लांबच लांब युग
पुस्तकातल्या अक्षरांवरून निर्जीव डोळे
डोळ्यांच्या धगीने पेटतात अक्षरे
ती येत नाहीय
असून नसल्यासारखं अेकटेपण
खाड खाड खाड खाड
माझ्यातून मीच चालता व्हावं
तिनं यायचं कबूल केलं होतं
नाही तर आभाळच डोक्यावर आलं असतं
पाअूस चिक् चिक् पुन्हा पुन्हा
गर्भार ढग अधीर
सगळी अक्षरे भिजून चाललीत
तिनं अेवढ्यात यायला हवं होतं

ही खोली आणि मी अेकटाच
थांबून आहे
कुणाच्या तरी येण्याची वाट बघीत
कोणी येणार नाही माहीत असूनही
अशाच अेका अेकलकोंड्या विषण्ण संध्याकाळी
येथेच कुणी येअून गेले
तेच बोचरे सूर येतील गाण्याचे कदाचित
अुठावं लागेल अर्ध्या पंक्तीवरून अुठतात तसं
रोजचीच हकीकत
ही अेक रिकामी जागा
सोबतः प्रेयसी हिचं नाव
सगळे जन्म संदर्भ शोधताना गळून गेलेत
आता कुठं फिरकणं नको
प्रेमच अुरलं नाहीय कुणा अव्यक्तात
कुणाच्या शेजेला नको
कुणाच्या मांडीवर डोकं नको
सगळ्या मांड्या दगड आणि
मांड्यांना केस फुटलेत
काळजाला फुटावेत तसे
पडलो असतो सुस्त डोळे झाकून तर
डोळ्यांना अुजेड दिसतो रात्रीत
तसं त्यांना बजावूनच ठेवलंय तिच्या
लांबसडक काळ्या केसांसारख्या हाकेनं

*

तू येच
विश्वासापलीकडून
समोर मिणमिणता दिवा ठेवलाय
अगदीच अशक्य झाल्यास
दिव्यावर झाप टाकून
माझ्या सिद्धांतांना धक्का देऊन
अगदीच अशक्य झाल्यास
केस मोकळे सोडून
तू येच

*

पावसाळ्यातल्या कितीक रात्री तुझ्या प्रतिक्षेत
हरवलेल्या काळजाचा वेध घेणाऱ्या पाऊसधारा
रंगीन बेहतरीन पुसून गेल्या आणि सुरू झाल्या
रखरखत्या निर्वासित वेळा आजकाल आशेनं अुभी
असतात निष्पर्ण वृक्षांची खोडं काळी कुळकुळीत
निर्जीव ज्यांना माझी ओळख पटलेली मुसळधार
पावसात घनघोर काळोख लपेटून असताना
घरांचे दरवाजे अैकू येतोय तुझा आवाज डोळ्यांना
काजव्यांच्या होणाऱ्या हळव्या नाजूक रंगीत स्पर्शासारखा
तुझ्या आवाजात गोठून जातो सगळा काळोख आणि
काळोखाची होतात झाडं, कबुतरं, मोर आणि असंख्य
काळी श्वापदं भयाकूल केविलवाणी त्यांच्या भेदरलेल्या नजरा
नाचतात माझ्या नग्न शरीरावर वादळाची चाहूल अशा
अेकाकी पावसात हरवलेल्या तुला शोधीत माझी मुकी नजर
गळून पडते हिरव्या सळसळणाऱ्या गवतात तू येणार असतेस
केसात रानटी फुलं माळून माझी दिग्विजयी रात्र सजवायला
तुझ्या स्तनांच्या गोलाकार कक्षेत साठवून रात्रीची अबोली स्तब्धता
निसटत्या पावसाच्या धारांतून तू फेर धरताना माझ्या
डोळ्यांभोवती अेक विलोभनीय संध्याकाळ माखून येते
जेव्हा आपण वाहिलेली असतात आपली प्रेतं

समुद्रकिनाऱ्यावर अुगवत्या सूर्याला जेव्हा आपण
न्याहाळीत असतो निर्वासित नजरांनी आपली
अपत्य घायाळ आक्रोशणारी वाळूच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर
जेव्हा आपल्या रात्रींना अुरतो फक्त नपुसकत्वाचा
आभाळ अर्थ तू येणार असतेस तेव्हा काटेरी झुडुपं पांघरून
तू येणार असतेस तेव्हा मरणाचा वाटोळा अर्थ क्रूसावर टांगून
तू येणार असतेस तेव्हा गंधगांधारी डोळ्यांवर पट्टी बांधून
मी माझे हजार पुत्र मरताना पाहिले माझ्या बंद डोळ्यांनी
आता कसला अर्थ शोधणार आहेस माझ्या भग्न डोळ्यांत
दिवस अुजाड झालेत पापण्या गळून गेल्यात डोळे
विद्रूप झालेत शरीराचं शरीरपण मुक्याने मरून गेलंय
आता राहिलेय अेकुलतं एक जगणं
ही रात्र संपेल किंवा संपणारही नाही तरी सुद्धा
शिल्लक राहतील तुझ्या पावलांच्या अुलट्या खुणा
माझ्या शय्येवर खुणांचा मागोवा घेत घेत तू
पाअूल अुचललंस तर पोचशील तुझ्याच गर्भात आणि
माझ्या समस्त डोळीयांची होअील एक सुंदर कबर
ज्यात तुझ्या रात्रींचे अुच्छ्वास साठविलेले असतील
तू अेक रात्र
अेक रात्र
माझ्या डोळ्यात मंतरलेली

*

सगळंच कसं विसरायला होतंय
झाडं पानं
आपलं म्हटलं असं किती तरी
केव्हापासून हे व्हायला लागलं
म्हणजे दचकून अंगावर शहारे येणं
गोष्ट ही अर्ध्यावरच संपलेली
तशा अजूनही अडखळतात पावलांत विचित्र
स्वप्नांच्या सावल्या
आणि आता मी एकटाच बसून आहे
येथून पुढे
लाटांच्या निर्मनुष्य किनाऱ्यावर

*

प्रार्थना मंदिरात
घंटेच्या निनादाखेरीज नसतंच काही सत्य
कातरवेळी शहारे अुमटतात अंगावर
प्रार्थना मंदिरात आळवले जाणारे सूर
देहासभोवर तेच
कुणाच्या भीतीनं वाजतात घंटा घणाणा घणाणा
घंटा वाजविणारे हात तरी कुणाचे असतात
कसायाला हात कुणी दिलेत
रस्त्यावर सर्वत्र मांडलेली प्रार्थना मंदिरे घोर अरण्यासारखी
अजून किती चालायचीच वाट

*

काळोख्या खिडकीत
काळोखा पक्षी
काळे गाणे
गातोय
काळोख खोलीत
काळी शाल पांघरून
ऐकतोय

*

पांढरी शुभ्र कबुतरं अुडून जाताना
अवकाशातून
डोळ्यांचे पंख फडफडतात
कबुतरांचे पाय रुतलेले असतात डोळ्यांत
कबुतरं त्यांच्या सोबत
घेअून जातात पंखांची गाणी
कबुतरांचे डोळे पाणावलेले नसतात घर सोडताना
कबुतरांच्या डोळ्यात
हेलकावत नसतो समुद्र
कबुतरांना नसतात आई–बाप, भाअू–बहिण, सगेसोयरे
कबुतरांचे आत्मे नसतात शोकाकूल
कबुतरांचे डोळे आकाशस्थ सताड उघडे
अवकाशाच्या पोकळीतून अुडून जातानाची कबुतरं
नि:स्तब्ध
प्रिये, तुला सांगूनही खरं वाटणार नाही...

*

आपण दोघं बसलोय समुद्राच्या कठड्यावर
परकेपणे एकमेकांची ओळख काढीत
अनोळखीपणे सूर्यास्ताला
दूरावलेला सूर्य झेपावतोय समुद्रात
सखे तुझे हात हवे हातात
समुद्राच्या कठड्यावर घोंगावतोय वारा
आणि मघाशीच दरडावून गेला काळचा डगल्यातला
काळा कुट्ट पोलीस
'काळोख होतोय अुठा काल दोन प्रेतं लागली किनाऱ्यावर'
समुद्रावर आकारत नाही काहीच
सूर्य सूर्यफूल चंद्र चंद्रफूल
कोसळणाऱ्या नावा उद्ध्वस्त चेहऱ्यांच्या
कठड्याला घट्ट चिकटून बैस
खाली टोकदार खडक आहेत
खेकडे आहेत कठड्याची उंचीही अफाट आहे
सखे आपले दोघांचे आत्मेही अलग आहेत
तुला समुद्राच्या तळाचा आवाज अैकू येतोय का
कान देअून अैक

घोंघावतोय वारा समुद्राच्या तळातूनच सारखा
तुला काहीतरी अैकू आलंय का
आज माझा वाढदिवस
आजपासून चौवीस वर्षांपूर्वी मी जन्मलो
अेके दिवशी या कठड्यावर आपण बसणार होतो
आज तो दिवस सखे
बोटात बोटं घालून घट्ट आवळ
किनारा रिकामा होत चाललाय
माणसं परतताहेत सगळी
रस्त्यांचे रंगही लागलेत बदलू
अुठ आता आपण निघूया
आपल्याला तो उखडलेला रस्ता ओलांडून
नवीन वळणानं जावं लागेल
पाय जपून टाक
असंच कर ना
माझ्या मागोमाग एकेरी पावलांवर पाऊल टाकीत ये
मी मधेच हात सोडणार नाही तुझा

*

फार दिवस झाले नाहीत
झाडांना दोन चार कविता दिल्या होत्या
तिच्या बरोबर फिरताना
झाडावर बसलेल्या पक्ष्यांना त्या आवडल्या होत्या
कदाचित ते झाड कुणी तोडलं देखील असेल
कदाचित ते पक्षी अुडूनही गेले असतील
कुणा भूकेल्या पारध्याचा काय नेम....?
पंचवीसशे वर्षांपूर्वी गौतम बुद्ध होऊन गेला
अेका बाण लागलेल्या पक्ष्याला कुरवाळताना....
परवाच ती भेटली तेव्हा विचारलं
झाडांना दिलेल्या कविता तुला आठवतात का ?
' कोणत्या कविता ? कोणतं झाड ?'
ते पक्षी......उडून गेलेत

*

ऐकटाच रस्त्यातून चालताना
झाडे स्तब्ध असतात निमूट
कुंपणाच्या थडग्यासारखी
अैलपैल थरथरत जातो अेका काळ्या
गाण्याचा स्वर
ओलांडीत आकाशाची निळसर रेषा
सगळ्या पक्ष्यांची गाणी
सुरुंग लावल्यासारखी भेदरून जातात
पानं अुसासे टाकतात
फुलं आंधळी होअून गळून पडतात अेकेक
अेकटाच रस्त्यातून चालताना
वेडीवाकडी स्वप्नं पडतात
झाडे चालत आहेत असं वाटतं
आणि सगळे रस्ते समुद्राला जाअून मिळालेत
सगळ्या रस्त्यांचा शेवट समुद्र
अेकटाच रस्त्यावर असताना
ओठ फडफडतात...... 'आमेन'

*

पुन्हा अेकदा जुन्या कविता चाळतोय
खरं तर हे असंच व्हायचं
परवाच मी अेका निर्जन रस्त्यावर होतो अुभा
समोरची झाडं मला चांगलीच ओळखत असावीत
मी अगदी दचकून जागा झालो
माझ्या अंगावरून झाडाची सावली अुत्तरेकडे
पसरली होती
माणसं असतात लांबुडकी सावली सारखी
हातपाय डोळे चेहरा हरवलेली
माणसं असतात तरी का ?
निर्जन रस्त्यावर मीच अेकाकी माणूस
बाकी सगळ्या
अुत्तरेकडे पसरत जाणाऱ्या सावल्या
माझ्या झाडांच्या उन्हाच्या सावल्या
आणि पूर्वेकडून केकाटत धावणारी
पांढरी शुभ्र सुसाट कबुतरं
क्षणात सावल्यांचं बर्फ व्हावं
इतकी शुभ्र
प्रेतावरच्या कफनासारखी स्वच्छ

*

ती सांगत्येय :
झाडाला पानं काढ
पानात फुलं काढ
झाडावर घरटं काढ
घरट्यात पक्षी काढ
पलिकडे निळेभोर आभाळ काढ
आभाळात फुलणारा चंद्र काढ
आभाळात फुलणारा चंद्र कसा काढू....
चित्र अर्धवट राहिलंय
झाड अेकाकी पोरकं झालंय

*

तू नाहीस
सर्वत्र शिशिर अंधार
अेका विरक्त हाकेचा होतोय जन्म आत
सर्वत्र मोकळी पानं
हिरवेपणा अुडून गेलेली
मरणाच्या आकांतिक सहवासाने
भरलेली पानगळ
अेका कोमेजलेल्या झाडाखाली
न चुकता सापडलेली

*

धुवीत दुपार
पाण्याने ओहोळ
संथ ओलेती
गोंजारीत खडक
ओलावीत काठांना
वसने बोलकी
नितळ कांतीची
अबोल पातर
पदीच्या पाण्यात
स्पर्शात सुखावली
डोईवर झेलीत
आकाशीचे वर्षाव
अेकाकी दुपार कलंडली

कोण कशाला बसलंय दबा धरून
काय शोधत
खिडकी बाहेरच्या काळोखात
वारं आलं आणि गेलं
मी गच्च आवळून घेतली खिडकी
घाबरून चोळामोळा झालेल्या जीवाला
केलं सुरक्षित बंदिस्त खोलीत
खोलीच्या बाहेर झाडांच्या कुजबुजण्याचे आवाज
त्यानंतर अेक वादळ खिडकीला थपडा देत निघून जाणारं
ओसरणाऱ्या पावसाच्या आवाजाबरोबर सुटकेच्या
दीर्घ निःश्वासाचा जन्म
खळबळ निवतेय अपरिहार्य बंदिस्त खोलीतही
झिरपतोय पाऊस पावसानंतरचा
तिच्या डोळयात अवेळी झिरपावा तसा
अवघं घरच लागलंय गळू. . . .

स्वत:साठी अेक धीरोष्ण श्वास घेऊन
नुकतीच अूमलू पहाणारी कळ दाबताना
झाडावर बसलेले दोन चार चुकार पक्षी भुर्रकन अुडून जातात
अुरतो फक्त एक सर्वस्पर्शी आवाज कापऱ्या पानांचा
गदगदून झाडं हालवणारा
भीतीने गाळण अुडालेला त्याचा आत्मा
धुंडाळू लागतो
दालना दालनातून
अेका संभाव्य हाकेचा शोध घेऊ लागतो
कळत नकळत थांबतो एका
जुन्या वास्तूपाशी आठवू लागतो
विरून गेलेल्या काळाची स्मृती अदृश्यावस्थेत डोळ्यांच्या
आणि अचानक थंडपणे त्याला जाणीव होते
तिच्या सहेतुक मोकळ्या स्मिताची अजूनही
अेका दालनात कधीच मिळाला नाही गर्भप्रवेश त्याची

*

समुद्र रस्त्यावर दुतर्फा
रस्त्याच्या पलिकडे समुद्र
समुद्र क्षितिजावर दूरात
समुद्र झाडांच्या पानगळीचा
खिडकी शेजारच्या समुद्रातला समुद्र
समुद्राचं अनाकलनीय झाड वादळसुन्न
समुद्र अवेळा अुफाळणारा डोळ्यात
समुद्र ती असून नसल्यासारखा
समुद्र आणि समुद्रझाडे
समुद्र आणि समुद्रपक्षी
समुद्र आणि समुद्रकोलाहल
समुद्रपार सरत जाणारे पक्ष्यांचे प्रवासी आवाज
समुद्र तिच्या स्तनांतून घोंगावणाऱ्या निळ्याभोर रक्ताचा
समुद्र दिशाहीन सर्वत्र
समुद्र उद्या इथे दिसणारही नाही
समुद्रझाडे
समुद्रपक्षी
समुद्र तिच्या डोळ्यांतून निवत जाणारा

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२६२
दा.क्र. काव्य
२३४०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

अपरात्री स्वत:ला विसरून
तिने गायीलेली गाणी
रस्त्यावरून निर्वासीत पोरासारखे
गस्त घालणारे त्याचे डोळे
हाकेच्या अंतरावरूनही मागे वळून
पहाता येऊ नये असे तिचे निश्चयी शब्द
माघारी परततानाची त्याची अपराधी पावलं
त्याचा अनावर हुंदका समुद्र वाळूत दबलेला
फडफडणाऱ्या ओठांमध्ये गच्च आवळलेलं तावदानी शिल्प
पाण्यात भिजून ओले तिच्या डोळ्यातील डोळे
आणि निरर्थक होत जाणारे
त्यांच्यामधील गाण्याचे संदर्भ
तो शोधतोय ते गाणं
अनोळखी होत जाणारं

*

पण थोडं दु:ख जपून ठेव
मी असा वहात चाललोय
चंद्र असा हवा होता
चंद्र तसा हवा होता
हे थोडं बाजूला ठेव
चंद्र असाच आहे
कलाकलांनी वाढत जाणारा
कलाकलांनी घटत जाणारा
तुझ्याच
समुद्र कित्येक शतकं अुफाळतोय असाच

तुझं गाणं अैकायचंय
तुझा आज सूर लागलेला दिसत नाही ?
तू विरस केलास
'प्लीज', तेवढा दिवा मालवून टाकू ?
तसं काही नाही
फक्त--
तुझं गाणं अैकताना तुला कुणी पाहू नये
*

धो धो सरीसारखं रडून घ्यावं
पाऊस पडून गेला की आकाश थोडं स्वच्छ होतं
ढग इतस्तत: पांगलेले आढळतात
नंतर फक्त आता पानांवरच्या थेंबांचा टपटप आवाज
किंवा अंग झटकून टाकावं इतपत रक्तातली सळसळ
आणि झाडाआड दबा धरून बसलेलं कुणीतरी
आता माझी सगळी तयारी झालीय
हिरव्या जर्द गुलाबाचं अेक लाल टपोरं फुल
सांडलंय माझ्या देहातून गळून पडलंय
त्याच्या पाकळ्यांचं सभोवार रान अुगवलंय
एक विलोभनीय रान आणि पावसाच्या थेंबांचं मुक्त संगीत
मला लागून आहे त्याचीच एक अनिवार ओढ
मी आता येणारच आहे तर
टप टप टप टाप टप टाप

*

ढगाळताहेत अपरंपार पोसलेली नाती
आगीच्या वणव्याने
काळ्या कभिन्न देहातून आरपार
मोकळू पहातोय मी
सोबतच नाकारावी असे दिवसांचे थवे
आगरात्री घेऊन घड्याळाच्या काट्याबरोबर
भरकटणारे
केविलवाणे हसू तिच्या अुघड्या बोडक्या
चेहऱ्याच्या आवरणातून
निःस्तब्ध या रात्रीच्या खविसांना
निष्पाप या स्थितीचे गिलावे
ओरखडे रूतलेल्या माझ्या लिंपलेल्या मनाला
त्यांचाच एक धगधगता दाह
चिंचेच्या पिकल्या पिवळ्या पानांची आरास
भूमीवर तसेच माझे दुःख पसरलेय
थेंबाथेंबाने तिच्या सर्वांगावर
अेखादा अुनाड क्षण लहरेल बहकेल उसळून
घुसळून तरी फेकून देअील तिच्या अनाकलनीय
डोळ्यांच्या निळ्याभोर डोहात

*

ती दोघं
अेकाग्रपणे अेकमेकांच्या डोळ्यांत
त्यांच्या वांझोटच्या नजरांनी न्याहाळीत होती
नुसताच पानांनी बहरलेला वृक्ष हिरवागार
नुकत्याच जन्मलेल्या तिच्या आंधळ्या बछड्याला
जबड्यात पकडून एक काळी मांजर
पार करीत होती माणसांचा समुद्र
समुद्र किनारी
असंख्य कावळे घारी गिधाडे बागुलबोवा
तिचे भयाकुल डोळे
त्याच्या भेदक नजरा--
ती निघून गेली सावधपणे समुद्र ओलांडून
वांझोटच्या झाडाची पानं किंचित सळसळली
त्याच्या डोळ्यांत कापरं भरलं
आठवणीचं एक पान नुसतंच हललं--

*

टप टप
टप टप
पागोळ्यांत
झुरते धरणी
काळोखी
काजवे
कन्हती दुखणी
काव काव
कावळा पुकारी
दे घर सोडून
पहाट झाली
दे घर सोडून...

*

अेखादी सुंदर कविता मनात साठवून ठेवताच येत नाही
विसरताही येत नाही गोठून पावसासारखं ढगात
काळचाकुट्ट सावली खालून हिंडताना
आभाळ तरी फुटू दे
मी तरी मिटू दे
कारण नसताना जन्मलो या बेवारशी माणसांत
पावलांचे तरी मातीवर ठसे अुमटू देत
मी रोजच अैकतो
माझी कवटी फुटताना
वाजणारं झांज
ढुमच्याक टुमच्याक
तीन तीन वडे
चल चल पुढे'
मढंही माझंच
वाजवणाराही मीच
परंपरागत टुमका
माझ्याच छाताडाचा क्षयी
आज मी माझ्या देहाला बजावून ठेवतोय
वधस्तंभ हृदयात कोरून
माणसाची गोची होताना
शेवटची अेक श्रद्धांजली तुझ्यासाठी
आणि अेक दीर्घ निःश्वास

*

तू पुन्हा ये
नव्यानं सजून ये
हिरवी फुलं माळून ये
हा अुचंबळून गाणारा समुद्र
अन् अुधानलेली बेहोश झाडं
मी पहातोय तुला : तू अेकटीच आहेस
ही अवेळा सरू देअू नकोस
वाळूच्या अतिभव्य किनाऱ्यावर
नाचू लागतील पिसाट मोर
शरीरभर बेहोषीत
तू ये
नव्यानं सजून ये

*

समारंभपूर्वक पक्ष्यांनी पंख छाटून दिले
पक्षी पिंजऱ्यातले कैदी झाले
त्या दिवसापासून
माणसांनी विधीनिषेध केला नाही
प्रेतातला आत्मा झोळीत टाकून
तो बैरागी
दारोदार भटकतोय
चुकून अेखादी स्त्री
झोळी भरील म्हणून

*

कातरवेळी कुणासाठी दुआ मागतो
मशीदीतला फकीर
काळोख चिरत जाणाऱ्या हिरव्या बांगेने होतंय काय
कुणी दिलीत लकेर अैकून फेकून शस्त्रे अुगारलेली
कातरवेळी कुणासाठी म्हणतात बगळे सायंप्रार्थना
अेकांतिक हिरव्या झाडांवर
कुणासाठी गस्त घालीत असतात कातरवेळी
कुणाचे आत्मे सैरभैर
कातरवेळी गाभाऱ्यातला किती काळोख अुजळून निघतो
सुजाण दिव्यांनी कुणापर्यंत पोचवलेली असते
संस्कृतीची नैतिक शिकवण
कातरवेळी देवळामागे गस्त घालणाऱ्या किती गिधाडांचे
पंख छाटलेले असतात लिखित न्यायसंस्थेनं
संतांच्या आशीर्वादानेही अजून विवस्त्र दिशाच का

ऋषीमुनींनी घालून दिलेल्या धड्यांचे अपभ्रंश अजूनही
अस्तित्व का
कुणा महंताचे डोळे थांबवू शकतात ही अखंड पानगळ
संस्कृतीची पारायणे गीतेचे परवचे
तिच्या घरात साचलेला काळोख
किंवा काळोखाच्या घरात ती व्रतस्थ
अजूनही तिला कळत नाहीय धर्म काय नीती काय
काळोखाचा दरारा पांघरून
कुणाच्या आठवणीत अुदास माझे डोळे...?
घरदार आहे का सुखरूप
की पाअूस पाण्यात वाहून गेल्या झोपड्या
संस्कृतीने दिले काय
इतिहासाच्या कागदोपत्री जमा काय
माझ्याही अंगावरून वारा वहातो काय

पहिल्या प्रश्नाला अेक शून्य
दुसऱ्या प्रश्नाला अेक शून्य
तिसऱ्या प्रश्नाला अेक शून्य
अशी झाली तीन शून्ये
आणि शंभरापैकी मला मात्र अेक शून्य
गाढव लेकाचा शून्याची बेरीज करता येत नाही
अेक शून्य + अेक शून्य + अेक शून्य = शून्य
अेक शून्य दुसऱ्या शून्यात
दुसरे शून्य तिसऱ्या शून्यात
आणि अेक भले मोठे शून्य
दुसऱ्याची किंमत शून्य करणारे
परब्रह्म

असू दे
असलेच तर तुझे
नागवे हात
गळताना
अंधार
दिव्यात
मीही
अधानलोय

*

ख्रिस्ताच्या प्रार्थनामंदिराचे दरवाजे असतात सदोदित बंद
आदळून आदळून परततात घंटानादासारखे इतका वेळ मूकपणे
प्रतिक्षा करणारे क्षण भित्रा आत्मा
ज्याच्यासाठी अश्रू ढाळावे असे घर नाही, दार नाही अखंड
मर्तिकांचा वास रस्त्यारस्त्यात गल्लीबोळात आणि निवांतपणे
अुत्तर रात्री आक्रंदन करणारी कुत्री भयभीत खिडकीजवळच्या
काळोखात
डोळे शोधताहेत भडाभडा आसवं.... आता थांबव तुझं गाणं
अंधारात बरं नाही वाटत

*

अशी बिनबोभाट भ्रमंती आवडेल
माझ्याच वेगात मृगजळासारखं भासमान
भिरभिरणं आवडेल माझ्याच रंगात
मिसळून घुसळून तेजाळणारा हिलाल होणं आवडेल
या शहराचे परके दरवाजे
लाजून मुरकून दुर्लक्षित कोनाडयात उसासणं आवडेल
अेखादी कविता मनात साठवून गोठवून बर्फासारखं
झिरझिरीत झुरणं आवडेल
नावडतीचं मीठ अळणी
माझ्याच युगात बेहोश होणं आवडेल
घरभरला सासुरवास आवडेल
मोकळा मोकळा होअून निर्मनुष्य पोकळीत कोसळणं
माझ्याच विचारात हतबुद्ध होणं
विचारापलीकडे बुद्ध होणं
मेणबत्तीच्या ज्योतीची फडफड होणं आवडेल
आपल्याच डोळयांवर झापडं पांघरणं आवडेल
कोण कधी जन्मले याची मला खंत नाही
माझंच रक्त ओरबाडणं मला आवडेल
मी नसलो तरी माझं अेकाकी अस्तित्व जोपासणं
माझ्या अंतरात्म्याची तिरडी बांधून माझ्याच
निर्माल्याची फुलं चढवणं मला आवडेल
मला आवडेल माझे डोळे जपत जाणे
माझ्या कंठातल्या कविता जगणे

*

भोवताली कलकलणारी झाडे
आणि दचकून जागे होणारे वृद्ध
मी चालतोय अेक लांबवर रस्ता

*

असा अवेळी डोंब उसळला तर
वाचव रे तिला तुझ्या अनावृत्त बाहूंनी
माझे अेकुलते अेक फूल वाहून जाताना
मी असा सुस्त पडून आहे
माझ्या बरोबरच्या अंधारासहित अंगाखांद्यावर
बांडगुळासारखा
तर थांबव रे पानगळीचा आवाज
तिची अस्फुट किंकाळी विरली असेल माझ्या
कानांच्या पाळचांपर्यंत पोचता
धुवांधार अंधार भेदताना आज माझ्या समस्त डोळीयांच्या
आकाशाचे पाणीच पाणी झालेय
जुळव अेकदाची तुझी अवाढव्य बोटे माझ्या
फाटक्या हाताखाली

*

साठव माझं अविरत गळणारं अस्तित्व माझ्या
चंद्रमौळी अडगळीच्या बाहूतून माझा
तुला नमस्कार
मी तिच्या हाकांना ओ देणार नाही
माझे सूर अगतिक
मी निमूट पाहीन माझ्या डोळ्यात विश्वाचं
दारूडेपण साठवलंय आणि चिक्क चिक्क
ओलेपण उरलंय तिच्या केसात गढूळलेल्या
स्फटिकासारखं
तिच्या कोवळ्या जाणिवांना मी माझ्या अमर्याद
सनातन बाहूत चुरगाळून टाकलं
तर माफ असू दे रे एक आयुष्य एवढं
माझ्या अतृप्त इच्छांना आंदण तरी दे
तुझ्या शिलकेतून
मी हा असा अस्तित्व विसरून तिच्या ओठांवर
सिगरेट सारखा जळत चाललोय
तर उघड रे तुझे नितांत सुंदर संगमरवरी डोळे
निनाद तरी मिटून टाक एकदा

*

आणि
पाऊस पुष्कळ कोसळतोय
ओढा तुडुंब वहातोय
आम्ही पाण्यात उभे
ती अन् मी
तिला पाण्याची खळखळ आवडतेय
तिच्या डोळ्यात खळखळ नाचतेय
ती ओढ्यातली खळखळ झालीय
तिचा पदर पाण्यावर लहर
तिने आपले हात पुढे केलेत
माझे डोळे लवून बघताहेत पाण्यात

*

एका उदासीन संध्याकाळी
घराबाहेर पडलो
शरीरात खळखळता समुद्र घेऊन
लाटा थाड थाड उसळत होत्या
किनाऱ्यावर
खडक सावरून बसलो
दूरच्या एका बेटावर पाहिला पडका बुरुज ताठ उभा
आणि मुकाट घराकडे वळलो
वाटेतच अश्वत्थामा भेटला
विचारपूस केली
हळहळलो
जखम दाबून धरली
त्यालाही एक मारेकरी भेटला होता
एका उदासीन संध्याकाळी

*

तर शेवटी
माझ्या निवांतपणाचं हसू झालंय
ही गर्द हिरवी झाडं
सजून मोहरून डोळ्यात खुपताहेत
ऋतु असेच असतात का बदलते
आठवणींच्या संदर्भात
आठवणीतील रात्र गर्द गहिरी
येतेय लाट ओसरायला पुन्हा
वाळूच्या लांबवर किनाऱ्यावरून
चालत होतो दोघं निवांतपणे
तर शेवटी

अेक प्रेतावरला भुंगा
तुझ्या दाढीत हच्युअेनत्संग रडतोय
तुझ्या कपाळावरल्या आठ्यांकडे बघून
गौतम बुद्ध हसतोय
तुझ्या चालीचा कुणालाच हेवा वाटत नाहीय
तुला चालताच येत नाहीय
तू देवळाभोवती फेऱ्या घालणाऱ्या भटजीसारखा
लुब्रा
तुझ्या चेहऱ्यावर सडलेले महारोगी नाचताहेत
तू अेक विटाळशीचं झाड
महिनोनमहिने तुझ्यावर
पालवीच फुटत नाहीय
तू विशाल वृक्षावर सुतार पक्ष्यानं चोचीनं
कोरलेल्या भोकात लपणारा वळवळ किडा
तू तूच आणखी कोणी नाही
तू प्रेतावरला भुंगा

*

काळोख झड कोसळतेय अंगात
डोळ्यात काळाकभिन्न पाऊस नागवतोय
झाडाझुडुपांच्या पानाफुलांवर थेंब थेंब
गळून पडताहेत समाधिस्थ अश्रु
पावसाच्या थेंबांना डोळे फुटलेत
पाऊस ओढून टाकू बघतोय
मेलेल्या ढोराला ओढून टाकाव तसा
दिशाहीन पंखांचा आवाज न देता
झेपावताहेत गिधाडं
काळोखाच्या सरी मला पुरून टाकताहेत
आतल्या आत माझ्या पावसाळी डोळ्यात

*

रमली ऽ ला ऽ ऽ
रमली ऽ ला ऽ ऽ
ती माझी कविता
शोधतेय
तिच्या गेलेल्या कोबळ्या केसांच्या गुंत्यात
सावल्यांच्या प्रेमात हुंदडलो
बेहोश मिठीत रमलीला
डोळा घातला
ावल्याच मरुन पडल्यात तिच्या डोळ्यांत
गवत अुगवलंय
तिने मिटून घेतलंय रमलीला
धपापणाऱ्या अुरात
चंद्र झालीखाली अुतरलाय
रमलीला ऽ ला ऽ ऽ
रमलीला ऽ ला ऽ ऽ
तू कुठायस – – ?

*

दिवसांनी वस्त्रे अुजाडून टाकली तरी
मी अुताणा बिछान्याला पाठ लावून
खंत करतोय
आजच्या दिवसाने माझे अस्तित्व पहाटे पूर्वीच
नाकारलं
माझ्या डोळ्यांत सतत जळताहेत रात्रीपासूनचे
निनावी दिवे
आग लावतो मी नशिबाला
माझ्या पर्यायी विश्वाचे माणूसपण मी अुभं करीन
म्हणतोय मुक्या पाखरांच्या हळव्या जाणीवांतून
कोण कोण कुठे कुठे जन्मले
माझ्या आईच्या स्तनांना कोणी कोणी लुचले तर
असू देत त्यांचे मला वेडा ठरवणारे चेहरे आणि
माझ्या गालाचा मुका घेणारे महारोगी हात
आता भोगताही येणार नाहीत
जिनं माझी नाळ कापली तीच खितपत पडलीय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२६२
दा. क.
संदर्भ शाखा

जुन्या तीर्थक्षेत्राच्या किनाऱ्यावर यातनांना
बेहोश करीत हे अेकांकीक नाटकाचे प्रवेश आणि
मुखवटयांचे प्रतिबिंबित राजकारण
माझ्या शब्दांचे होतात किडे वळवळतात
त्यांना विटाळतात.
म्हणून अेक पूर्ण अंध विराम माझ्या डोळस श्रद्धांना
म्हणून अेक पूर्ण विराम माझ्या जाणिवा आणि सोशीकतेला
म्हणून अेक पूर्ण विराम माझ्या माणसाळलेपणाला
सवतीच्या इंद्रियांना धक्का न लगो
कवितेच्या आठवणीने गर्भपात न घडो
झडून जाअू देत माझ्या डोळ्यांच्या पापण्या
मी विद्रुप माझ्या कातडीवरचं सोलीव आवरण
झडून जाअू दे माझी यातनाशिल्पं
ज्यांना एक भला मोठा पदर आहे
जुनेरांच्या डोळ्यांचा

*

तो मैलांचे हाकारे घालतोय
त्याच्या बापानं कंदिल आणायचं कबूल केलंय
कळप टाकलेलं वासरु चुकलंय....
तर दिशा दिशांत ब्यँऽऽब्यँऽचा कल्लोळ
बाप बराच दूर दिसतोय...
झाडीझाडीत तर अेकेक काळे कुरुप हिंस्त्र श्वापद
रक्त चुसण्याला सवकलेलं पिढीजात

*

कोणताही सूर्यास्त
दु:खाला देत नसतो मूठमाती
सूर्योदयानेही पालवी फुटत नसते नव्या आशेला
सगळंच असतं अखंड अव्यभिचारी
त्याच्या पूर्व संस्कारानी पिडीत समाजपुरुष
आंधळ्या आवेगाने चघळत असतो मांसाचे गोळे
आणि त्याचा घोडा असतो फुटत अुरीपोटी रक्ताळत
त्याचा लगाम असतो आदिम व्यवस्थेच्या खिदळण्यात
त्याचे शिकारी कान टपलेले असतात स्वैर रानात
भरारी घेणाऱ्या पक्ष्यांचा चित्कार टिपण्यासाठी
तीव्रतेचा होतच असतो अुपहास आणि जीवघेणी थट्टा
त्याच्या सनातन विश्वात म्हणून,
दीर्घ रात्रीच्या प्रदीर्घ चुंबनाची अपेक्षा तू
करायलाच नको होतीस 'आना,'—

रोजचा संभोग
अुरकीत रोज ठरवीत
मनाशी नवीन संभोग समाधी अवस्था
आपण रात्री सजवीत गेलो

रोजच बदलायचे ठरवून त्याच्या
छोटया मोठया समजुतींनीही
आपण सनातन होत गेलो

आपण चुचकारत राहिलो
खोटया समजावणीने
आपले बोचरे अपयश आपण
अेकमेकांना बेमालूम फसवत गेलो

आपण अुध्वस्त झाल्यावरही
अुभारू लागलो आपल्या
आठवणींचे वाढदिवस हनीमूनस्

आपली गळून गेलेली
मुलायम नवता
रोजच अुगवणाऱ्या सूर्याला आपण
नवीन रंग फासत गेलो

आपण खरोखरच विद्रूप झालो
इतके की विद्रूपच होत गेलो
शोकेस मधल्या स्त्रीयांसारखे आपण नटून राहिलो

आपण अुत्तर रात्री संभोगानंतर
आरोपीत गेलो अेकमेकांना
कळवळत दोघेही
अेकमेकांच्या आठवणीत
अेकमेकांना दोषी ठरवून

भोवतालचे जग त्याची प्रतिक्रिया
आपण
विसरू शकलो नाही
आपले चेहरे क्रूर होत गेले
विदूषकी आणि नाटकी—

*

रात्रीच्या कामचलाऊ
तहानंतर आपली
बोलणी फिसकटली

रोजच्या अयशस्वी
वाटाघाटी नंतरही
नित्यनियमाने
आपली तरुण शरीरं
तहाला अुभी ठाकली

आपण पादाक्रांत केले
प्रदेश अेकमेकांच्या
सरहद्दी ओलांडून
गाजवले मुलुख
मैदान भररात्री
युद्धाच्या
अेकमेकांपासून
सरकत दूर अेकान्तात
सावल्या होत पारख्या

रोजच सूर्योदयाला
आंघोळ अुरकून
रात्रीचे कपडे बदलीत
आपल्या प्रेतांवरून

ओरखडे पुसणारे
गाल चोळीत
आरशासमोर
युद्धाचे जयपराजय
नाकारीत
आपण पाहू शकत नाही
अेकमेकांच्या नजरांना
नजरा भिडवून

अगदी थंडपणे वहावत
विद्युत् प्रवाहासारखे
घरभर आपण
अेकमेकांच्या वावरानेही
आपल्याला अुपद्रव होअू लागला

आपण भयंकरच
थकलेलो घायाळ
रात्रीच्या युद्धानंतर,
तहानंतरही
रात्रीपूर्वीच्या

हातात शस्त्रास्त्रे नसूनही
अंगावर जखमा नसूनही

अंधाराला गिळंकृत करणारा अंधार

आपण
रोजच सूर्योदयाला
आंघोळ अुरकून
रात्रीचे कपडे बदलीत

सरहद्दीवर बर्फाळ
रस्त्यांचे देखावे
शुभ्र चादर पांघरून
झोपी गेलेली झाडे
पाने फुले पाकळ्या
शस्त्रास्त्रे निपचीत

चिमण्या पाखरांच्या
चित्काराची चाहूल नाही
कुरकुर
कुजबुज
कोणाचीच
आपल्या

नेमाने घरातले दिवे
पेटतात आणि विझतात
अथांग शांततेत

अेकअेकटे

*

दोस्त किती भयाण भितूर
गुदमरणारे
अेकअेकटे दोस्त
रस्त्यांवरून रस्ते ठरवीत
दोस्तांचे असूनही शहर
दोस्तांची असूनही गावे

ओळखीची

दोस्त असूनही कानालगत
दुभंगणारी फळी असते
निर्णायक
दोस्त फुटत आतून
पोलादासारखे होत तप्त
दोस्त आठवत
आपल्या रात्री
अपरात्री
मेणबत्तीत म्लान होत

दोस्त अुठून मिटत
ओठात ओठ
आलिंगत सुवासिक
केशसंभार

दोस्तांचे महाल
लपलेले अुंच

इमारतींच्या आडोशाला
ऋतु असे झपाझप बदलणारे
श्वासागणिक
अुंच इमारतींची
स्वप्ने पहाणारे दोस्त

दोस्त अेकमेकांना
प्रश्नच विचारत
अनुत्तरित
अरण्य दोस्त

अेकाकी प्रवासातले
चौफेर

हे शहर दोस्तांना देअू
शकत नाही अेखादा क्लब
त्यांच्या कवितांची राखण
करण्यासाठी
आठवणींचे पहाड अुतू जावे
म्हणून अपरात्री एखादा
गुत्ता,

दोस्तांनी अेकान्त साधावा विचारांचा
म्हणून हे शहर
देऊ शकत नाही

मैदानं मोकळी
धुळखात नसतं पडलेलं
काहीच या शहरात
आणि नसतं जपून ठेवलेलं
दोस्तांसाठी
सगळंच असतं कुणाच्या तरी कब्जात
अडकलेलं

रे दोस्तांनो
आपले ओळखीचे प्रदेश
परके होताहेत
आपण होतोय गुलाम
हुंदडणारे पाय
साखळदंडात रोवले
जाताहेत
रे बेवारशी दोस्तांनो
आपण अेकमेकांच्या
आठवणीत

रे विसरा तुमची
संकेत स्थळं

जागा गेल्यात भरून
पटापट

‘ नो व्हेकन्सी ’
झाडं तुटलीत सगळी
रे स्वागत असो औद्योगिकरणाचं
आणि
हे तर लष्करी तळ
बिनचेहऱ्याचे

रे दोस्तांनो
आपण धडपडत
अुरीपोटी फुटत
लिहित कविता
मायेपोटी
पाब्लो नेरुदा
किंवा मायकोव्हस्की
आणि गॉर्कीची आई

दोस्त
कविता वाचून
खरोखरच सुखी
आहोत का आपण

आपण अेकमेकांना
समजावून घेतलंच नाही
आणि आपले तार्किक वाद

आपली मातीमोल स्वप्नं
खरंच का मातीमोल ?

रे दोस्त
तुझ्याजवळ
कॉंट्रीबुशनसाठी पैसे नाहीत
आणि तुझा लळा दोस्तांचा

सगळ्या दोस्तांना लुबाडून
तो खातो अुसळपाव
मध्यरात्री

तो दारूसाठी जुळवित पैसे
झोपतो पायऱ्यांवर
तारेवर पक्षी
आणि
प्रिय,

कमलची स्वप्न कुठेत ?
आणि तुझा आदिम संभोग...

तुझा जळता अंधार
कुठे ठेवणारे रे
स्वतःलाही अनोळखी
दोस्त,

तुझं तूच करीत सांत्वन
किती घटका
तुझा गिळलेला पाय सुसरीनं
आणि घोड्यांच्या पाठीवरून मिरवणुका
कर्जाअू
हे आजचे अपरिचित दोस्त
मिटलेले आणि
अुभारणारे,

चला रे दोस्त
कॉंट्रीबुशनने पिअू या '

*

तो कमवत असतो
तो खात असतो
स्वतःचं
तो झोपत असतो
स्वतःच्याच बायकोजवळ
नित्यनियमाने
तो हादरवत घराच्या भिंती
आवाजाची घेत दक्षता
भिंतीबाहेर न फुटण्याची
मिरवत बायकोसमोर
धिटाईनं
म्हणत कोण वाकडं करणार
माझं बायकोला
अेकान्तात वाढलेलं
पौरुष्य दाखवत
कौडकौतुक करवून घेत
रात्रीला
तो झाडांसारखा वाढत
आदिम मुळं रुजवित
तो हादरवतो
बायकोच्या डोळ्यांत
घराच्या भिंती
आढ्याचं छप्पर

तो हादरवतो
बायकोची बेंबी
चुरगाळत कोबीच्या
पानांसारखी स्तनं
तो बांधत दुर्वांकुरांच्या जुड्या
मेरेवर

त्याची असते
रात्र त्याच्या
मालकीची
केसाळ योनी
दिव्यांची बटणंही
असतात त्याच्या हातात
त्याच्या हातात असते
शुचिर्भूतता आणि
तो वाढवत असतो
गुदामात
मोरॅलिटीची झाडं

तो शिकवीत स्वत:ला
फुटपाथवरून चालावं
आपण एक यान्त्रिक
पिटीत टाळ
सामावून घेत दिंडीत

सार्वजनिक ऋतूंच्या
आणि अुत्सवांच्या
तो अखंडपणे असतो
चालत फुटपाथवरून
त्याचं असतं तत्त्वज्ञान
बंडाचं
'कर नाही त्याला डर कशाला'
घरमालकाच्या
दरडावणीच्या सुराला
तो डरकाळत
स्वत:वर वैतागत

गुलामांच्या राज्याचा
तो करित असतो
विचार नेटका
तो हाकारीत असतो
त्याचा रथ
निर्धारानं
आयुष्यभर
रथांची चाकं रांगत
पिढ्यान् पिढ्या

तो खिकाळत
दिवसा रात्री अपरात्री
अुधानलेला

म्हणत असतो
मी आहे समुद्र आदिम
मी आहे वादळ वारा
भन्नाट दिशांध

तो स्वत:चा चेहरा
आरशात न्याहाळत
तो स्वत:च्याच आरशातल्या
प्रतिमेला चॅलेंज करीत

हा आरसा आहे
टाकायचा बदलून मला
भिंतीवर लांबरुंद
अल्जेरियन कॉस्टली
बसवायचा

हा तर गुलामांचा राजाच
सारत बाह्या
थोपटत दंड
आसनस्थ
नंतर त्याचा चहा येतो
नंतर त्याचा फराळ होतो
नंतर त्याचा पेपरही वाचून होतो
नंतर तो त्याची राजकीय मते
बायकोला अैकवतो

नंतर तो सामाजिकही बरंच
काही बोलतो
नंतर देशाचं अर्थशास्त्र सुधारलं
म्हणजे महागाई जाईल
याचंही गणित
बायकोपुढं मांडतो

बेलची, एरणगाव
तो ऐकवतो

तो सारासार
सगळ्याचा विचार
करतो,
'विरार फास्ट, बोनस, लीव्ह फेअर कन्सेशन,
लिव्ह सँक्शन, डिमान्ड लोन, ३१ चा ३० ला पगार'
—अशी स्वप्नं पहात झोपी जातो

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२६२
दा. क्र. का१०५
२३५०
ग्रंथ शाखा

अशी अेकाकी वाटू नये
सगळे पंख छाटून घेतल्यावर
अेका दीर्घायुष्याची कविता
आत्मनिवेदनाचं विच्छेदन
झाल्यावरही,

अुलथून टाकायचं हे रान
हिरवंगार
फांदीमुळं आणि गोदामं
आकांताचे डेरेदार वृक्ष

माणसं
रानं बागा जपत जगणारी
मालकी हक्काने बागात मुतणारी
जुनाट शेंदूरलेल्या अेकांतात
परमात्म्याला स्मरून लाग अुरकून घेणारी.

आभाळ नुसतंच विस्तीर्ण
रस्ते संपलेले हे शहर
पुन्हा सूर्य बेमालूम फसवा
होत जाणारा महाभारतकालीन
युद्धपर्वासारखा पारंपारिक सनातनी

*

REFBK-0022262
REFBK-0022262